# पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

**-: प्रेस नोट :-** दिनांक - १६/०९/२०२४

## बदलापूर, जि. ठाणे या ठिकाणी छापा टाकून एम.डी.(मेफेड्रॉन)हा अंमली पदार्थ निर्मिती करणारा कारखाना उध्वस्त केलेबाबत

| | |
|---|---|
| **कक्ष** | अं.प.वि.कक्ष, घाटकोपर युनिट, गु.शा., बृहन्मुंबई. |
| **गु.र.क्र. व कलम** | ५३/२०२४, कलम ८(क), २२(क), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ |
| **गुन्हा घडला, दिनांक** | दिनांक ११/०९/२०२४ रोजी |
| **गुन्हा दाखल दिनांक** | दिनांक ११/०९/२०२४ रोजी |
| **घटनास्थळ** | १) मानखुर्द, मुंबई<br>२) बदलापूर, ठाणे |
| **अटक आरोपी** | एकुण ०४ पुरुष आरोपी |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | १) एकुण ०.१६८ कि.ग्रॅ. वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ, किं.रू.३३,६०,०००/-<br>२) Toluene द्रव्य १२३ किलो वजन<br>३) Liquor Ammonia १८.२०० कि. ग्रॅम वजन<br>४) Chloroform ११.५२० कि. ग्रॅम वजन<br>५) ॲसिड ०५.६६० कि. ग्रॅम वजन<br>६) Aluminum Chloride ०१.९०० कि. ग्रॅम वजन<br>७) HCL CR ४०.२०० कि. ग्रॅम वजन<br>८) ब्रोमिन सदृश्य पदार्थ ९०० ग्रॅम वजन<br>९) D.M.F. द्रव्य १.४६० कि.ग्रॅ. वजन<br>१०) ACETONE द्रव्य १.४४० कि. ग्रॅम वजन<br>११) १.५८० किलो ग्रॅम वजनाची पांढऱ्या रंगाची पावडर -<br>१२) एकूण ०४ मोबाईल<br>**एकुन कि.अं. ८२ लाखपेक्षा अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त.** |

**थोडक्यात हकिगत** - अंमली पदार्थ विरोधी कक्ष, घाटकोपर युनिट, गुन्हे शाखा, मुंबई च्या पोलीस पथकाने दिनांक ११/०९/२०२४ रोजी मानखुर्द, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे एम.डी. (मेफेड्रॉन) विक्री करणाऱ्या दोन इसमांस ताब्यात घेतले. दोन्ही आरोपींचे ताब्यातून एकूण १०६ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) अं.किं. २१,२०,०००/- रूपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरुध्द अं.प.वि.कक्ष गु.र.क्र. ५३/२०२४, कलम ८ (क), २२ (क), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

नमूद गुन्हयातील अटक आरोपीकडे केलेल्या तपासामध्ये आरोपी क्र. ३ याचा सदर गुन्हयांतील सहभाग निष्पन्न झाल्याने, आरोपी क्र. ३ यास अटक करण्यात आली. अटक आरोपी क्र. ३ याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास केला असता, त्याचेकडून प्राप्त माहितीवरून बदलापुर कर्जत हायवे लगत, बदलापुर, वांगणी, जि. ठाणे याठिकाणावरुन एम.डी.(मेफेड्रॉन)

बनविणाऱ्या कारखान्याचा शोध लागला. सदर कारखान्यामध्ये छापा टाकुन एकूण २०६ किलो वजनाचे विविध केमिकल व १ किलो ५८० ग्रॅम वजनाची एम.डी.सदृश्य पांढऱ्या रंगाची पावडर तसेच सदर गुन्हयांत एकूण १८६ ग्रॅम वजनाचा एम.डी. जप्त करण्यात आला आहे.

अटक आरोपी क्र. ३ याचेकडे केलेल्या तपासावरून अटक आरोपी क्र. ४ यास अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी क्र. ४ हा उच्च शिक्षित असून, रसायनशास्त्राचे शिक्षण घेतलेले असून, बदलापूर येथील एका कंपनीमध्ये प्रोडक्शन मॅनेजर म्हणून काम करत आहे. आरोपी क्र. ४ याने याने आपल्या शिक्षणाचा वापर एम.डी. या अंमली पदार्थ निर्मितीसाठी केला आहे.

अशा प्रकारे अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे घाटकोपर युनिट यांनी धडक कारवाई करत बदलापूर, ठाणे येथे एम.डी.(मेफेड्रॉन) निर्मिती करणारा कारखाना सिल केला आहे. सदर गुन्हयात एकूण १६८ एम.डी. हा अंमली पदार्थ एकूण अं.किं.रू.३३,६०,०००/-, १ किलो ५८० ग्रॅम वजनाचा एम.डी.सदृश्य पांढऱ्या रंगांची पावडर व एकूण २०६ किलो वजनाचे विविध केमिकल्स असा एकूण ८२ लाखापेक्षा अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, घाटकोपर युनिटचे प्रभारी पो.नि.श्री. भगवान बेले यांचे नेतृत्वाखाली पो.नि. दिगंबर पाटील, पो.नि. अभिजित अहिरराव, स.पो.नि. राघवेंद्र लोंढे व स्टाफ या पथकाने केली आहे.



------0000------